साप्ताहिक

''एकच ध्येय... एकच आवाज''

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक ३२ वा | सोमवार, दि. २४/०८/२०२६ ते दि. ३०/०८/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## धुळ्यात अत्याधुनिक शासकीय कॅन्सर रुग्णालय व संशोधन केंद्र सुरू करा
## आमदार अनुपभैया अग्रवाल यांची आरोग्यमंत्री आबीटकरांकडे आग्रही मागणी



धुळे– भौगोलिक दृष्ट्या उत्तर महाराष्ट्रातील महत्त्वाचे ठिकाण असलेले धुळे शहर खान्देशातील आरोग्य सेवेच्या दृष्टीनेही तितकेच महत्त्वपूर्ण आहे. या पार्श्वभूमीवर धुळे जिल्ह्यासह खान्देशातील लाखो नागरिकांच्या आरोग्य व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी धुळे येथे अत्याधुनिक शासकीय कॅन्सर रुग्णालय व संशोधन केंद्र सुरू करावे, अशी आग्रही मागणी शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याणमंत्री प्रकाश आबीटकर यांच्याकडे केली. आरोग्यमंत्री आबीटकर नुकतेच धुळ्यातील जिल्हा रुग्णालयातील महिला व बाल रुग्णालयाच्या उद्घाटनासाठी आले होते, त्यावेळी आमदार अग्रवाल यांनी आरोग्यमंत्री आबीटकर यांच्याकडे कॅन्सर रुग्णालय सुरू करण्यासह विविध मागण्या मांडल्या तसेच त्या मागण्यांची निवेदनेही दिली.

कॅन्सर रुग्णांची मुंबई-पुण्याकडे धाव – आमदार अग्रवाल यांनी निवेदनात म्हटले आहे, की धुळे जिल्हा गुजरात व मध्य प्रदेश या राज्यांसह जळगाव-नंदुरबार-नाशिक या तीन जिल्ह्यांच्या सीमांलगत आहे. तसेच संपूर्ण जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गांसह दळणवळणासाठी विविध राज्य मार्गांच्या सुविधेमुळे धुळे शहरातील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह सर्वोपचार रुग्णालय तसेच जिल्हा रुग्णालय आणि शहरातील अन्य खासगी रुग्णालयांत मोठ्या संख्येने रुग्ण उपचारांसाठी दाखल होतात. आज धुळे शहर आपत्कालीन आरोग्यसेवेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठिकाण आहे. मात्र, कॅन्सरसारख्या गंभीर आजारावर उपचारांसाठी आजही मुंबई-पुण्यासह मोठ्या शहरांत जावे लागते. सामान्य व गोरगरीब रुग्णांना कॅन्सरच्या उपचारांसाठी वारंवार मोठ्या शहरांत जाऊन उपचार घेणे त्यांच्या आर्थिक आवाक्याबाहेरचे ठरते. त्यामुळे त्यांना कॅन्सर उपचारांपासून वंचित राहावे लागते.

धुळ्यात हवे सुसज्ज कॅन्सर रुग्णालय – या पार्श्वभूमीवर धुळे शहरात किमान ३०० खाटांचे सुसज्ज कॅन्सर सुपर स्पेशालिटी शासकीय कॅन्सर रुग्णालय सुरू करावे. रुग्णालयात कॅन्सर तपासणी, निदान, अत्याधुनिक शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिओथेरपी, इम्युनोथेरपी, पीईटी सीटी स्कॅन, एमआरआय, लिनियर एक्सिलरेटर, तसेच आवश्यकतेनुसार बोन मॅरो ट्रान्सप्लांटसह सर्व आवश्यक सुविधा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी आमदार अग्रवाल यांनी केली.

सॅटेलाइट कॅन्सर केअर युनिट सुरू करा – या कॅन्सर रुग्णालयाच्या मंजुरीसह उभारणीस लागणारा कालावधी लक्षात घेता प्राथमिक टप्प्यात टाटा मेमोरिअल सेंटर किंवा अन्य नामांकित कॅन्सर रुग्णालयांच्या तांत्रिक सहाय्याने शहरात तातडीने कॅन्सर ओपीडी डे केअर केमोथेरपी, कॅन्सर स्क्रीनिंग व फॉलोअप सेवा सुरु कराव्यात, अशी मागणी आमदार अग्रवाल यांनी केली.

कॅन्सर संशोधन व प्रशिक्षण केंद्र – आमदार अग्रवाल यांनी सांगितले, की धुळे येथील कॅन्सर रुग्णालयाला भविष्यात उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक कॅन्सर केंद्र म्हणून विकसित करून कॅन्सर संशोधन व प्रशिक्षण केंद्र सुरू करावे. नर्सिंग, पॅरामेडिकल व तांत्रिक मनुष्यबळ प्रशिक्षणाच्या सुविधाही सुरू कराव्यात. महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून पात्र रुग्णांना जास्तीत जास्त उपचार सुविधा मोफत द्याव्यात, दूरवरून येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाइकांसाठी सुसज्ज धर्मशाळा, अल्पदरात निवास, भोजन आदी सुविधा द्याव्यात, आदी मागण्याही त्यांनी केल्या.

अत्याधुनिक रुग्णवाहिका द्या – धुळे जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गांचे जाळे असून, जिल्हाभरातून रोज हजारो प्रवासी व मालवाहतुकीची वाहने ये-जा करतात. यात अनेकदा गंभीर अपघात झाल्याने आपत्कालीन स्थितीत गंभीर जखमींना काही मिनिटांत उपचारपूर्व सेवा त्यांचे प्राण वाचविण्यात निर्णायक ठरते. यासाठी जिल्ह्यात गरजेनुसार विशेषीकृत आधुनिक रुग्णवाहिकांचे स्वतंत्र नेटवर्क उभारावे. त्यासाठी भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह धुळे जिल्हा रुग्णालयास स्वतंत्रपणे सर्व सुविधा व यंत्रणांनी सज्ज आधुनिक रुग्णवाहिका व त्यासाठी प्रशिक्षित चालक, जीवनरक्षक उपकरणे, इंधन निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही आमदार अग्रवाल यांनी आरोग्यंत्री आबीटकर यांच्याकडे केली.

जिल्हा रुग्णालयाला डॉ. आनंदीबाई जोशींचे नाव द्या – आमदार अग्रवाल म्हणाले, की भारताच्या वैद्यकीय इतिहासात महिलांसाठी नवा मार्ग निर्माण करणाऱ्या महाराष्ट्र कन्या डॉ. आनंदीबाई यांचे कार्य आजही लाखो युवतींसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्याचा उचित सन्मान व्हावा यासाठी धुळे शहरातील जिल्हा रुग्णालयाला भारतातील पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांचे नाव द्यावे, तसेच रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराजवळ किंवा रुग्णालयाच्या प्रशस्त आवारात डॉ. आनंदीबाई जोशी यांचे भव्य स्मारक उभारावे, त्यांच्या जीवनकार्याची माहिती देणारे प्रेरणा केंद्र तथा स्मृती दालन उभारावे, वैद्यकीय शाखेतील गुणवंत विद्यार्थिनींसाठी डॉ. आनंदीबाई जोशी वैद्यकीय प्रेरणा पुरस्कार सुरू करावा, आदी मागण्याही आमदार अग्रवाल यांनी आरोग्यमंत्री आबीटकर यांच्याकडे केल्या.

## धुळे जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभार रणजितसिंह राजपूत यांनी स्वीकारला



धुळे (जिमाका) – धुळे जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभार रणजितसिंह राजपूत यांनी स्वीकारला. यापूर्वी ते जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार या पदावर कार्यरत होते. माहिती व जनसंपर्क क्षेत्रातील दीर्घ अनुभवासोबतच बहुमाध्यम संवाद, डिजिटल माध्यमे आणि शासकीय जनसंपर्क क्षेत्रातील विविध अभिनव संकल्पना प्रत्यक्षात साकारण्याचा अनुभव त्यांना आहे.

वृत्तपत्र व जनसंज्ञापन, विधी तसेच राज्यशास्त्र या विषयांत पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या श्री. राजपूत यांनी आपल्या कारकिर्दीत विविध क्षेत्रांत आणि पदांवर काम केले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एड्स नियंत्रण प्रकल्पात उपसंचालक (आयईसी), वडाळा, मुंबई, देना बँकेच्या बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथे व्यवस्थापक (जनसंपर्क) मंत्रालय, मुंबई येथील वृत्त शाखेत कार्य अधिकारी तसेच विभागीय माहिती कार्यालय, अमरावती व नाशिक येथे सहाय्यक संचालक म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. याशिवाय नाशिक, नंदुरबार व धुळे येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून त्यांनी काम केले आहे.

शासकीय माहिती व जनसंपर्क व्यवस्थेला बदलत्या माध्यमविश्वाशी जोडण्यासाठी अभिनव प्रयोग करण्यावर श्री. राजपूत यांनी विशेष भर दिला आहे. राज्यातील पहिले 'मॉडेल जिल्हा माहिती कार्यालय व बहुमाध्यम केंद्र' नंदुरबार येथे त्यांनी साकारले आहे. पारंपरिक प्रसिद्धी व्यवस्थेसोबत आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल माध्यमे आणि बहुमाध्यम सुविधांचा समन्वय साधण्याच्या दृष्टीने हा उपक्रम राबविण्यात आला.

धुळे येथे राज्यातील पहिले 'माहिती व जनसंपर्क भवन' उभारण्याची संकल्पनाही श्री. राजपूत यांची होती. शासकीय माहिती व जनसंपर्क यंत्रणेला स्वतंत्र, सुसज्ज आणि आधुनिक स्वरूप देणारी ही संकल्पना धुळे येथे प्रत्यक्षात साकारल्यानंतर शासनाने या संकल्पनेचा स्वीकार संपूर्ण राज्यासाठी केला.

डिजिटल माध्यमांचा शासकीय जनसंपर्कासाठी प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीनेही श्री. राजपूत यांनी अभिनव प्रयोग केला. देशातील पहिले शासकीय डिजिटल साप्ताहिक 'यशार्थ'ची संकल्पना आणि निर्मिती त्यांनी यशस्वीपणे प्रत्यक्षात आणली. या अभिनव कार्याची दखल घेत २०१८ मध्ये नागरी सेवा दिनानिमित्त धुळे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला होता. प्रशासकीय व जनसंपर्क क्षेत्रातील कामाबरोबरच लेखन आणि संशोधनाचीही श्री. राजपूत यांना विशेष आवड आहे. सारंगखेडा यात्रा व चेतक फेस्टिव्हल, प्रकाशा सिंहस्थ, तोरणमाळ तसेच या परिसराच्या ऐतिहासिक महत्त्वावर त्यांनी विपुल लेखन व संशोधनपर लेखन केले आहे. स्थानिक इतिहास, परंपरा, लोकसंस्कृती, पर्यटन आणि वैशिष्ट्यपूर्ण वारसा व्यापक स्तरावर पोहोचविण्यासाठी त्यांनी विविध माध्यमांतून लेखन केले आहे.

माहिती व जनसंपर्क क्षेत्रातील सेवेदरम्यान शासनाच्या लोककल्याणकारी योजना, धोरणे, निर्णय आणि विकासकामांची अधिकृत माहिती प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविणे, शासन-प्रशासन आणि प्रसारमाध्यमांमध्ये समन्वय साधणे तसेच पारंपरिक माध्यमांसोबत डिजिटल व समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करण्यावर त्यांनी भर दिला आहे. नंदुरबार येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून कार्यरत असताना आदिवासीबहुल जिल्ह्यातील विकासात्मक आणि सकारात्मक बाबींना व्यापक प्रसिद्धी देण्यासोबतच शासनाच्या विविध योजना व जिल्हा प्रशासनाच्या उपक्रमांची माहिती वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल आणि समाजमाध्यमांच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले. धुळे जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्री. राजपूत यांचे स्वागत केले.

शासनाच्या योजना, धोरणे आणि निर्णयांची अधिकृत, वस्तुनिष्ठ व विश्वासार्ह माहिती नागरिकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचविणे तसेच धुळे जिल्ह्यातील विकासात्मक, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि सकारात्मक बाबींना आधुनिक माध्यमांच्या साहाय्याने व्यापक प्रसिद्धी देण्याला प्राधान्य राहील, असे श्री. राजपूत यांनी यावेळी सांगितले.



# रक्षाबंधन

**विशेष लेख...**

रक्षाबंधन हा श्रावणातील प्रमुख सण आहे. यामध्ये बहिणी आपल्या भावाला राखी बांधतात. रक्षाबंधन हा हिंदूंचा एक लोकप्रिय वार्षिक सण आहे, जो दक्षिण आशिया तसेच जगाच्या इतर भागांमध्ये विशेषतः हिंदू लोकांद्वारे साजरा केला जातो. या दिवशी सर्व वयोगटातील बहिणी त्यांच्या भावांच्या मनगटाभोवती राखी म्हणजे एक पवित्र आणि आकर्षक दोर विधिवत बांधतात. ही राखी त्यांच्या भावांकडून त्यांचे रक्षण करण्याचे प्रतीक मानले जाते. परंपरेनुसार राखी बांधल्यानंतर भाऊ बहिणीला भेटवस्तू देतो. रक्षाबंधन हा हिंदू दिनदर्शिकेतील श्रावण महिन्यात साजरा केला जातो, जो सामान्यतः ऑगस्टमध्ये येतो. रक्षाबंधन ह्याचा शब्दशः संस्कृत अर्थ संरक्षण, बंधन किंवा काळजी असा होतो. बहीण-भावाचा हा सण, ज्याचा उगम लोक-संस्कृतीमध्ये झाला, त्याला स्थानानुसार वेगवेगळी नावे होती; काही ठिकाणी सलुनो, सिलोनो आणि राकरी असे म्हणले जात होते. विवाहित स्त्रियांसाठी या सणाचे विशेष महत्त्व आहे. काही प्रदेशांमध्ये किंवा गावांमध्ये बहिर्विवाह प्रथा आहे. यामध्ये वधू तिच्या जन्माच्या गावाबाहेर लग्न करते आणि प्रथेनुसार तिचे पालक तिच्या विवाहित घरी जात नाहीत.

उत्तर भारतातील ग्रामीण भागांत जिथे अनेक खेड्यांमध्ये बहिर्विवाह पद्धती प्रचलित आहे, तिथे मोठ्या संख्येने विवाहित हिंदू स्त्रिया दरवर्षी त्यांच्या पालकांच्या घरी सणासाठी परत जातात. त्यांचे भाऊ, जे विशेषतः पालकांसोबत किंवा जवळपास राहतात, कधीकधी त्यांच्या बहिणींच्या विवाहित घरी त्यांना परत घेऊन आणण्यासाठी जातात. अनेक तरुण विवाहित स्त्रिया त्यांच्या जन्माच्या घरी काही आठवड्यांपूर्वी येतात आणि समारंभ होईपर्यंत राहतात. भाऊ हे बहिणीचे सासर आणि माहेर यांच्यामध्ये आजीवन मध्यस्थ म्हणून काम करतात. शहरी भारतात, जिथे कुटुंबे अधिकाधिक विभक्त होत आहेत, तिथे हा सण अधिक प्रतीकात्मक बनला असला तरीही तो खूप लोकप्रिय आहे. या उत्सवाशी संबंधित विधी त्यांच्या पारंपारिक प्रदेशांच्या पलीकडे पसरले आहेत. तंत्रज्ञान, स्थलांतर, चित्रपट, सामाजिक संवाद आणि हिंदू धर्माच्या राजकीय प्रचाराद्वारे या सणाचे स्वरूप बदलले जात आहे. रक्ताचे नाते नसलेल्या स्त्रिया आणि पुरुषांमध्ये स्वैच्छिक नातेसंबंधांची एक बदललेली परंपरा देखील आहे. यासाठी जाती आणि वर्गाच्या पलीकडे, तसेच हिंदू आणि मुस्लिम हा भेद विसरून राखी बांधली जात आहे.

हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला'रक्षाबंधन' म्हणतात. या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो. हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पौर्णिमेस राखी बांधावी, असे धर्मशास्त्रात म्हणले आहे. या विधीस 'पवित्रारोपण' असेही म्हणतात. भावाचा उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते.

उत्तर भारतात हा सण राखी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून भावास दीर्घ आयुष्य व सुख लाभो मिळो अशी कामना करतात. राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतःला गुंतवून त्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे. राखी बांधण्याच्या या सणातून स्नेह व परस्परप्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. रक्षाबंधन म्हणजे हातातील राखीस साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण करण्याचे वचन देणे.

काही प्रांतात नोकर आपल्या मालकाला, ब्राह्मण आपल्या यजमानाला, मुलगी आपल्या वडिलांना, आणि पत्नी नवऱ्याला राखी बांधते. आपल्यापेक्षा बलवान, समर्थ माणसाला राखी बांधून आपल्या रक्षणाचे वचन घेणे हीच यामागची भावना आहे. भारतीय समाजात ऐक्य आणि प्रेमभाव वाढीस लागावा यासाठी रक्षाबंधनाचा सण राजपूत लोकांत रूढ झाला. आजकाल मात्र बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा सण म्हणून हा सण साजरा होतो. या दिवशी बहिणी आपल्या सख्ख्या भावाच्या हातावर राखी बांधतातच आणि शिवाय त्या बंधुत्वसमान नाते असलेल्या व्यक्तीसही राखी बांधतात. बहीण या दिवशी भावाला ओवाळून त्याच्या हातावर राखी बांधते आणि आपले भावाविषयी प्रेम व्यक्त करते. या सणाचे आधारस्तंभ म्हणजे प्रेम, पराक्रम, सय्यम आणि साहस. निस्वार्थ प्रेमाची व्याख्या म्हणजे भावा-बहिणीचं नातं होय. पूर्वजांनी भारतीय संस्कृती मध्ये या नात्याच्या पवित्रतेचा महिमा गायला आहे. आपल्या भारत देशाने संस्कृतीचे उत्तम उदाहरण देऊन मानवाला योग्य दिशा प्रदान केली आहे. स्त्री सन्मान हा सुद्धा या सणामधून दिलेला उपदेश होय. फक्त स्त्री हक्क आणि स्त्रीला वरवर सन्मान देणाऱ्या लोकांना तिचे महत्त्व कळत नाही.

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः। यत्रेतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः।'

ज्या कुळामध्ये स्त्रीची पूजा, म्हणजेच मान-सन्मान, सत्कार होतो, तेथे सुशील, गुणी व उत्तम मुलं होतात आणि जिथे स्त्री सन्मान नसतो तिथे कुठलीही प्रगती होत नाही. हा विचार लहानपणीपासून समाजामध्ये रुजविण्याचा प्रयत्न ह्या सणाद्वारे केला जातो. राखी' ह्या शब्दातच रक्षण कर' - राख म्हणजे सांभाळ' हा संकेत आहे. कुठल्याही कर्तबगार, धाडसी शूरवीराने याचक, दुर्बल, वृद्ध, आजारी, असहाय्य, अपंग व अबलांचे रक्षण करणे हा धर्म आहे. हेच लक्षात घेऊन याच दिवशी रेशमी धागा अशा करारी पुरुषाच्या हाती बांधून त्याच्याकडून रक्षणाचे अभय घेण्याची ही प्रथा आहे. हे अभय शास्त्राधारे पौरोहित्य करणारे पुरोहित आपल्या यजमानघरी स्वतः सर्वांना राखीचा रेशीमधागा मंत्रोच्चारांसह बांधून देतात. यातला गर्भित अर्थ नात्याचे रक्षण करणे हाच आहे.

रक्षाबंधनाची सुरुवात केव्हा झाली, याबद्दल निश्चित पुरावा नाही; पण त्याविषयी एक आख्यायिका आहे. पूर्वी देवदानवांच्या युद्धात दानवांच्या शक्तीपुढे देवांचे काही चालत नसे. दानवांचा राजा वृत्रासुर याने देवांचा राजा इंद्र याला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र घेऊन युद्धास निघाला. त्या वेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शची हिने विष्णूकडून मिळालेला एक दोरा (राखी) इंद्राच्या हातावर बांधला. त्या राखीच्या प्रभावाने इंद्राला त्या युद्धात विजय मिळेल, अशी तिची श्रद्धा होती. इंद्राचा विजय झाला आणि त्याचे गेलेले वैभव परत मिळाले. या प्रसंगाची आठवण म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत पडली, असे सांगितले जाते. २.हिंदू पौराणिक कथेनुसार, महाभारतात, जे एक महान भारतीय महाकाव्य आहे, पांडवांची पत्नी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाच्या मनगटामधून वाहणारे रक्त थांबवण्यासाठी तिच्या साडीचा कोपरा फाडून त्याच्या मनगटावर बांधला कारण भगवान कृष्णाने अनवधानाने स्वतःला जखमी केले होते. अशा प्रकारे, भाऊ आणि बहीण आणि भगवान श्रीकृष्ण यांच्यात एक बंध निर्माण झाला आणि द्रौपदीचे रक्षण करण्याचे वचन दिले.

विधीचा प्रयोग असा- सूर्योदयी स्नान करतात. उपाकर्म करून ऋषींचे तर्पण करतात अपराह्णकाळी राखी तयार करतात. तांदूळ, सोने व पांढऱ्या मोहऱ्या एकत्र करून त्यांची पुरचुंडी बांधल्याने रक्षा अर्थातच राखी तयार होते. मग तिची पूजा करतात. नंतर पुढील मंत्राने ती राखी मंत्री राजाला बांधे. - येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः । तेन त्वामपि बध्नामि रक्षे मा चल मा चल ॥ (अर्थ- महाबली दानवेंद्र बळी राजा जिने बद्ध झाला, त्या रक्षेने मी तुलाही बांधतो. हे रक्षे, तू चलित होऊ नकोस.) यावरून मूळचे हे बंधन राजासाठी होते असे कळते. या श्रावण पौर्णिमेला 'पोवती पौर्णिमा' असेही म्हणतात. कापसाच्या सुताच्या नवसुती (नऊ धाग्यांची जुडी) करून तिला आठ-बारा किंवा चोवीस गाठी मारतात व त्यांच्या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू, महेश, ओंकार, सूर्य इत्यादी देवतांचे आवाहन करून हे पोवते प्रथम देवास वाहून नंतर तसलीच पोवती कुटुंबातील माणसांच्या मनगटावर बांधली जातात. श्रावण पौर्णिमेसच श्रावणी असे देखील म्हणले जाते. पाऊस पडल्यानंतर आनंदी झालेले लोक समाधानाने वेदपुराणाची कथा ऐकण्याचे उत्सव साजरे करीत. तर कुमारांना शिक्षण घेण्यास सुरुवात करण्याचा मुहूर्त याच काळात काढला जात असे. अध्ययनाचा प्रारंभ, शौर्याचे शुभचिन्ह या दोन गोष्टी मनोमन लक्षात ठेवणे व तसे आचरण करणे म्हणजे श्रावणी' साजरी करणे होय. श्रवण नक्षत्रावर श्रावणी करतात.हा सण म्हणजे बहिण भावाचे अतूट नाते दाखवतो.

श्रावण महिन्यात जानवी बदलण्याचा कार्यक्रम असतो. हा ऋग्वेदी आणि शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मणांसाठी नागपंचमीच्या दिवशी अर्थात श्रावण शुद्ध पंचमीला, ऋग्वेदी, हिरण्यकेशी आणि तैत्तिरीय ब्राह्मणांसाठी वर्णषष्ठीच्या दिवशी अर्थात श्रावण शुद्ध षष्ठीला, किंवा सर्वसामान्य ब्राह्मणांसाठी श्रावण पौर्णिमेला होतो. तमिळ पंचांगाप्रमाणे श्रावणी पौर्णिमेच्या दिवशी अवनी नावाचा तमिळ महिना चालू असतो, म्हणून या दिवसाला तमिळ पंचांग पाळणारे लोक अवनी अवित्तम म्हणतात. अवित्तम म्हणजे धनिष्ठा. दुसऱ्या दिवशीच्या पौर्णिमेला चंद्र धनिष्ठा नक्षत्रात असतो. जर पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर पहिल्या दिवशी ऋग्वेदी ब्राह्मणांची आणि दुसऱ्या दिवशी यजुर्वेदी ब्राह्मणांची श्रावणी असते. सामवेदी ब्राह्मणांची श्रावणी गणेश चतुर्थीला असते.

रक्षाबंधनच्या सणाप्रमाणे दक्षिण भारतात कार्तिक महिन्यात कार्तिकेय सण असतो. या दिवशी बहीण आपल्या भावास जेवण देऊन त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते व भाऊ तिचे रक्षण करण्याचे वचन देतो. रक्षाबंधन हे आपल्या व इतरांच्या जीवनामध्ये पवित्रता व मांगल्य निर्माण करण्याचे बंधन आहे. जैन लोक हा दिवस रक्षापर्व म्हणून पाळतात. त्या दिवशी जैन मंदिरातून राख्या ठेवलेल्या असतात. जैन मुनी त्यांचे आदराने ग्रहण करतात. उत्तर भारतात नोकर मालकाच्या हाताला राखी बांधतात.

## वडार समाजाच्या लेटरपॅडवरील पुराव्याच्या आधारे विनाअट जातीचे दाखले तात्काळ द्या

## वीर-वडार एकता फांउडेशनचे संस्थापक अध्यक्ष विजय गोरे यांची वडार समाजाच्या मेळाव्यात मागणी

धुळे - वीर-वहार एकला फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विजयगोरे याच्यानेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्राल वडार समाजाचे मेळाने आयोजिल करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने धुळे शहरातील चक्करवाडी परिसरातल बहार समाजाचा भव्य मेळावा उत्साहात संपन्न झाला यावेळी समाजाच्या विविध प्रश्नाठर चर्चा करून शासनाकडे विविध मागण्या करण्यात आल्या. विजय गौरे यानी सांगितले की, वडार समाजाचा इतिहास हा महाराष्ट्राच्या शिल्प, स्थापत्य आणि बांधकाम परंपरेशी जोडलेला आहे पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील मूर्ती तसेच रायगड किल्ल्यासह सुमारे साडेतीनशे किल्ल्याच्या बांधकामाल वडार समाजाचे योगदान राहिले आहे. छत्रपती शिवाजी महाराजाच्या स्वराज्य उभारणीत वडार समाजातील हिरोजी इटळकर यानी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे त्यांनी नमूद केले. रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी आजही हिरोजी इटळकर यांच्या नावाचे शिल्प उपलब्ध असल्याचे सांगत गोरे यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला तसेच हिरोजी इटळकर याच्या सागण्यावरून छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्याला 'रायगड' हे नाव दिल्याचे त्यांनी नमूद केले वडार समाजाच्या बोलीमध्ये दगडाला 'राय' असे संबोधले जाते आणि त्यावरून 'रायगड' हे नात पडल्याचा संदर्भही त्यांनी दिला. समाजाच्या सद्यस्थिती बाबत बोलताना गोरे यानी वडार समाजाला जातीचा दाखला देताना असलेली १९६१ सालच्या





पुराव्याची अट रद्द करून वहार समाआच्या लेटरपॅडवरील पुराव्याच्या आधारे विनाअट जातीचे दाखले देण्यात यावेत, अशी मागणी केली. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून वडार समाजासाठी स्वतंत्र आश्रमशाळा सुरु कराव्यात, अशीही मागणी त्यांनी केली. वडार समाजातील घर नसलेल्या नागरिकांना लाभघरकुलाचा देण्याबरोबरच उदरनिर्वाहासाठी गायरान जमीन उपलब्ध करून द्यावी पारपरिक व्यवसाय बंद झाल्यामुळे समाजासमोर रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला असून, गायरान जमीन उपलब्ध करून देऊन समाजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करावे, अशी मागणी करण्यात आली. महिलांना ग्रहात गठाच्या माध्यमातून सक्षम करावे आणि वडार समाजातील मजुरांसाठी मजूर सोसायट्या स्थापन करण्यास प्राधान्य द्यावे, असेही गोरे यांनी सांगितले. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक टी एस चव्हाण, संजय कुसळकर, अरुण लष्कर, अशोक शिंदे, **(पान ३ वर)**

# सामाजिक बांधीलकी जोपासत शिवसेना ओबीसी राज्य संपर्क प्रमुख तथा पत्रकार अनिल पाटील धमने यांनी शेकडो विद्यार्थी यांना वही पेन व सचित्र बालमित्र पुस्तक वाटप व वृक्षारोपन करून केला साध्या पद्धतीने वाढदिवस साजरा


नांदेड – दि २४ ऑगस्ट रोजी शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे राज्य संपर्क प्रमुख तथा ओबीसी संघर्ष महासंघाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस व एन टी एस ए संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष व्हॉईस ऑफ मिडीया पत्रकार संघाचे नांदेड जिल्हा सचिव तथा नांदेड जिल्हा प्रतिनिधी दै समर्थ गांवकरी . दै समर्थ राजयोग . गोपाळचावडी ग्रा पं सदस्य प्र अनिल पाटील धमने यांनी त्यांच्या वाढदीवसा निमित्त सामाजीक बांधीलकी जोपासत गेल्या अनेक वर्षापासून हाडको वाघाळा येथिल संतोष कन्या प्राथमिक शाळा येथिल पहिली ते पाचवी पर्यंतच्या सर्व विद्यार्थी यांना प्रत्येकी एक वही . एक पेन . सुचित्र बालमित्र उजळनी चौदाखडी पुस्तक. देऊन वाढदिवस साजरा केला . तर गोपाळचावडी येथील जिल्हा परिषद शाळा येथिल शाळेत पहिली ते चौथी पर्यंत च्या प्रत्येकी विद्यार्थी यांना सुचित्र बालमित्र चौदाखडी पुस्तक व एक वही एक पेन देऊन तर लहुजी साळवे निराधार निराश्रीत बालकाश्रम साईबाबा नगर वाडी पाटी तालुका नांदेड येथिल निराधार निराश्रीत बालकांना प्रत्येकी दोन वही एक पेन एक






बिसकीट पुडा व फळ वाटप तर विष्णुपुरी येथिल ग्रामिण दिव्यांग मुकबधीर विद्यालय येथे वही पेन सुचित्र बालमित्र उजळणी चौदाखडी पुस्तक तर संतोष कन्या . सिडको वृत्त पत्र विक्रेते यांच्या पाल्यांना शैक्षणिक प्राथमिक शाळा व ग्रामिण दिव्यांग मुकबधीर विद्यालय व लहुजी साळवे निराधार निराश्रीत बालकाश्रम या ठिकाणी वृक्षारोपन विद्यार्थी यांना फळ वाटप व वृक्षारोपन करून सामाजीक बांधीलकी जोपासत विविध उपक्रमांनी केला साध्या पध्दतीने आपला वाढदिवस साजरा. ज्या समाजात आपण जन्माला येतो त्या समाजाचे कांही देणे लागते हा हेतु डोळ्या समोर ठेऊन सामाजीक बांधीलकी जोपासत शिवसेना ओबीसी राज्य संपर्क प्रमुख पत्रकार अनिल पाटील धमने यांनी दर वर्षा प्रमाणे याही वर्षी एक चांगला आगळा वेगळा अभिनव उपक्रम राबवुन पैसे इतरत्र खर्चा न करता एका सामाजीक हीताच्या कामात खर्चा करावा हे हेतू डोळ्या समोर ठेऊन जवळपास तिनशे ते चारशे विद्यार्थी यांना शालेय उपयोगी शालेय साहीत्य वाटप करून साध्या पध्दतीने आपल्या वाढदीवसा निमित्त दि २४ ऑगस्ट रोजी संतोष कन्या प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोपाळचावडी तसेच लहुजी साळवे निराधार निराश्रीत बालकाश्रम येथे शालेय साहीत्य वाटप व सिडको वृत्त पत्र विक्रेते यांच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले तर गोपाळचावडी , वृक्षारोपन व फळे वाटप करण्यात आले यावेळी प्रमूख उपस्थिती व्हॉईस आफ मीडीया चे मराठवाडा अध्यक्ष डॉ गणेश जोशी . भाजपाचे युवा नेते नगरसेवक संजय पाटील घोगरे . महिला बाल कल्याण समिती उप सभापती प्र राजू लांडगे . नगरसेवक वैजनाथ देशमुख . नगरसेवक प्र सतिष बस्वदे . गोपाळचावडी ग्रा प चे उप सरपंच साहेबराव पाटील सेलुकर. छावा संघटनेचे भास्कर हंबर्डे . संजय सोनकांबळे .गणेश जिंदम . विनोद जोंधळे . विजय पांचाळ . विजय ठाकुर . आनंदा वाघमारे . बालाजी आचमे . चंद्रकांत म्यानेटवार . राजू कऱ्हाळे , बालकाश्रमाच्या मॅडम व कर्मचारी उपस्थित होते.यांच्या सह अनेकांच्या उपस्थितीत शिवसेने ओबीसी राज्य संपर्क प्रमुख पत्रकार अनिल पाटील धमने , यांचा वाढदीवस दि २४ ऑगष्ट असा दोन दिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करन्यात आला यावेळी संतोष कन्या प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गणेश ढगे सर . संजिव सिद्धापूरे सर . ईश्वर धुळगंडे सर. आश्विनी आवळे मॅडमैं. वर्षा देशमुख मॅडम . यांच्या सह गोपाळचावडी जिल्हा परिषद शाळे च्या शिक्षक उपस्थित होते . यांच्या सह आदिनी परिश्रम घेतला अनेकांनी वाढदीवसाच्या शुभेच्छा सह हा अनोखा अगळा वेगळा अभिनव उपक्रम राबवील्या बद्दल शासकीय,राजकीय , सामाजिक, शैक्षणिक . पत्रकार ,क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी पत्रकार अनिल पाटील धमने यांचे तोंडभरून कौतुक करत शुभेच्छा दिल्या.

**ओबीसी विभागाचे राज्य संपर्क प्रमुख अनिल पाटील धमणे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा संदेश पत्राद्वारे शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी शुभेच्छा पत्रात वाढदिवस म्हणजे एक नवी सुरुवात आपल्या सर्व जिवलगांना एकमेकांशी घट्ट बांधणारा हा दिवस आयुष्यातील आजवर मिळवलेले यश क्षण आणि सात याबद्दल कृतर्थता आणि खुणावणारे भविष्य असा सविस्तर भावना या दिवशी मनात असतात आपल्या कर्तुत्व आणि बुद्धिमत्तेच्या बळावर समाजकार्य घडावे आणि राष्ट्रहितासाठी आपले भरीव योगदान लाभावे आपली साथ माझ्यासाठी नेहमीच आशा आश्वासक आहे पुढील काळी असाच आनंद यश आणि आकांक्षाच्या पूर्ततेचा असो या मनपूर्वक सदिच्छा आशा प्रकारे संदेश दिले आहे त्या बद्दल अनिल पाटील धमने हे भारावुन गेले असुन या आमच्या कामाची दखल घेऊन आमच्या मुख्य नेत्यांच्या पत्रा मुळे मला आणखी बळ मिळाले असुन मोठी उर्जा मिळाली आहे या पुढेही पुर्ण महाराष्ट्रात मोठ्या ताकदीनीशी ओबीसी संघटन वाढवण्याचे काम करू आणि असाच आर्शीवाद रूपी थाप साहेबांचा असावा असा संदेश दिला .**



उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

प्रति,
श्री. अनिल मारोतीराव धमणे पाटील
शिवसेना ओबीसी राज्य संपर्कप्रमुख, नांदेड

चक्करबर्डी, धुळे

**वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा !**

वाढदिवस म्हणजे एक नवी सुरुवात. आपल्या सर्व जिवलगांना एकमेकांशी घट्ट बांधणारा हा दिवस. आयुष्यातील आजवर मिळवलेले यश, क्षण आणि साथ याबद्दल कृतार्थता आणि खुणावणारे भविष्य अशा संमिश्र भावना या दिवशी मनात असतात.

आपल्या कर्तृत्व आणि बुद्धिमत्तेच्या बळावर समाजकार्य घडावे आणि राष्ट्र हितासाठी आपले भरीव योगदान लाभावे. आपली साथ माझ्यासाठी नेहमीच आश्वासक आहे. पुढील काळही असाच आनंद, यश आणि आकांक्षांच्या पूर्ततेचा असो, या मनःपूर्वक सदिच्छा.

|| जीवेत् शरदः शतम् ||

**एकनाथ संभाजी शिंदे**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

कार्यालय : ६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दूरध्वनी : ०२२-२२०२ ५०१४ / २२०२ २४०१
ई-मेल : dcm@maharashtra.gov.in, संकेत स्थळ : www.maharashtra.gov.in

# वडार समुदायाच्या सामाजिक–आर्थिक स्थितीवर संशोधन: प्रा. विनायक लष्कर यांना पीएच.डी.



अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, बारामती येथील समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. विनायक सुभाष लष्कर यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथून समाजशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. 'पुणे आणि अहमदनगर शहरातील वडार समुदाय यांच्यातील सामाजिक–आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास' या विषयावरील संशोधनासाठी त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली. हा संशोधन प्रबंध डॉ. ज्ञानेश्वर काशिनाथ भांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाला.

प्रा. लष्कर यांनी गेल्या दोन दशकांपासून भटक्या–विमुक्त जाती–जमातींच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रश्नांवर सातत्यपूर्ण संशोधन व अभ्यास केला आहे. संशोधन, धोरण निर्मिती, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमधील सहभाग तसेच विविध नियतकालिकांमधील लेखनाद्वारे त्यांनी या समाजघटकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्याचे कार्य केले आहे. ते अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात समाजशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील 'विमुक्त आणि भटक्या जमातींच्या स्वतंत्र अभ्यास केंद्राच्या' स्थापनेसाठी नियुक्त तज्ञ समितीचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. तसेच ईकोनेट, यशदा, टाटा समाज विज्ञान संस्था (मुंबई), स्त्री अभ्यास केंद्र (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), सोपेकॉम, प्रयास आणि निसदा आदी संस्थांच्या विविध संशोधन प्रकल्पांमध्ये संशोधन सहाय्यक व सल्लागार म्हणून त्यांनी योगदान दिले आहे.

भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयांतर्गत विमुक्त, भटक्या आणि अर्ध–भटक्या जमातींसाठीच्या राष्ट्रीय आयोगाच्या तज्ञ समितीवरही त्यांनी काम केले आहे. याशिवाय भटक्या–विमुक्त जाती–जमाती अभ्यास केंद्राच्या अभ्यास मंडळावर, तसेच तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्या अभ्यास मंडळाचे प्रमुख आणि विद्या परिषदेचे सदस्य म्हणूनही ते कार्यरत आहेत. प्रा. लष्कर यांच्या 'वडार समाज : समाजशास्त्रीय अभ्यास' या पुस्तकाला 'सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील साहित्य पुरस्कार–२०१५' तसेच 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वाङ्मय पुरस्कार–२०२४' प्राप्त झाला आहे. त्यांच्या 'विमुक्ती कोलाहल' या काव्यसंग्रहालाही 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वाङ्मय पुरस्कार–२०२५' मिळाला आहे. भटक्या–विमुक्त समाजाच्या उत्थानासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 'राष्ट्रीय युवा गौरव पुरस्कार–२०२२' प्रदान करण्यात आला आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते ६,३६,०३६ पात्र शेतकऱ्यांना ५,०८६ कोटी वितरीत

मुंबई – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील ६,३६,०३६ पात्र शेतकऱ्यांना ५,०८६ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट ऑनलाइन पद्धतीने वितरित करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या योजनेच्या अंमलबजावणीअंतर्गत आतापर्यंत १२,५८,२४३ शेतकऱ्यांना एकूण १०,११५ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला आहे. पात्र शेतकऱ्यांना लाभ वितरणाची प्रक्रिया सुरू असून, लाभार्थींची संख्या सातत्याने अद्ययावत होत आहे.आतापर्यंत १३.७० लाख कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील लाभ वितरण ऑनलाइन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मंत्रिमंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी आणि सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते. दुसऱ्या टप्प्यात विभागनिहाय लाभ – अमरावती विभाग : १ लाख ४५ हजार ८०८ शेतकऱ्यांना १,२०८ कोटींचा लाभ. नाशिक विभाग : ८४ हजार ८१३ शेतकऱ्यांना ७५६ कोटींचा लाभ. छत्रपती संभाजीनगर विभाग : ३ लाख २ हजार २७३ शेतकऱ्यांना २,२८४ कोटींचा लाभ. पुणे विभाग : ४९ हजार २२४ शेतकऱ्यांना ४१७ कोटींचा लाभ. नागपूर विभाग : ४४ हजार ८६४ शेतकऱ्यांना ३६६ कोटींचा लाभ. कोकण विभाग : ९ हजार ५४ शेतकऱ्यांना ५४ कोटींचा लाभ. योजनेची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत असून, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या नियंत्रणाखाली या प्रक्रियेचे व्यवस्थापन केले जात आहे.

(पान २ वरून)

## वडार समाजाच्या मेळाव्यात...

प्रवीण बाविस्कर, भूषण ठाकरे, लक्ष्मण विटेकर, गणेश धोत्रे, बापू गुंजाळ, भैया लष्कर, सागर कुसळकर, राहुल लष्कर, सुरेश मंजुळकर, विनोद गुंजाळ, सागर लष्कर, विकी साळवे, चंद्रकांत लष्कर, ईश्टार लष्कर, रामू लष्कर, संजय पवार वडार समाजाचे अध्यक्ष सतीश सूर्यवंशी मनोज सूर्यवंशी भूषण शिंदे नाना पवार अशोक शिंदे शिवदास शिंदे अनिल सूर्यवंशी बारकू पवार औरंगाबाद जिल्हा चे वडार समाजाचे नेते अशोक शिंदे कन्नड तालुका वडार अध्यक्ष वसंत पवार रवींद्र शिंदे, कुणाल कुसळकर, आंनद जी पवार पिपळनेर नंदुरबार जिल्हाचे प्रतिनिधी भरत सूर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवर व समाजबांधत उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अरुण लष्कर यांनी केले.

# 'महा ई-एचआरएमएस' प्रणाली ही गतिमान प्रशासनाचा चेहरा ठरेल-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई - देशात मनुष्यबळ व्यवस्थापनामध्ये राज्याने अनेक सुधारणांसह आमूलाग्र बदल केले आहेत. या सुधारणांमध्ये महाराष्ट्र हे देशात अव्वल आहे. त्याचेच उदाहरण ही 'महा ई-एचआरएमएस' प्रणाली आहे. ही प्रणाली गतिमान प्रशासनाचा चेहरा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त करीत महाराष्ट्राने डिजिटल सामर्थ्याची आणखी एक उत्तम यशोगाथा देशासमोर ठेवली असल्याचे गौरवोद्गारही काढले. महाराष्ट्र शासनाच्या 'महा ई-एचआरएमएस', 'महा-आयएएस' आणि 'मेंटॉर मेंटी पोर्टल' या डिजिटल मानव संसाधन व्यवस्थापन प्रणालींचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सह्याद्री राज्य अतिथिगृह येथे आयोजित कार्यक्रमात शुभारंभ करण्यात आला, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी 'जिज्ञासा' या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सहाय्यकासह देशातील पहिले स्वयंचलित मॉड्यूलही कार्यान्वित करण्यात आले. याप्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, कौशल्य, रोजगार, नाविन्यता आणि उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा, भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शासकीय व्यवस्थेमध्ये सेवा देताना अधिकारी, कर्मचारी शासन निर्णय, नियम आणि 'टिकमार्क' करण्याच्या पद्धतीमध्ये अडकून गेलेला असतो. शासकीय प्रक्रिया पुनर्रचना अर्थात जीपीआर अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या व्यापक प्रशासकीय सुधारणांचा हा पहिला टप्पा आहे. शतकाहून अधिक काळ प्रचलित असलेल्या कागदाधारित प्रशासकीय कार्यपद्धती आणि सेवापुस्तकाच्या देखभालीचे आधुनिकीकरण करून त्या अधिक सुलभ, गतिमान आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्यासाठी हा उपक्रम महत्वाचा आहे. राज्य शासनाने सुमारे दोन वर्षांपूर्वी सुरू केलेल्या शासकीय प्रक्रिया पुनर्रचना उपक्रमाचा आणि प्रस्तावित एकात्मिक मानव संसाधन व्यवस्थापन प्रणालीचा हा प्रमुख घटक आहे. शासकीय सेवेमध्ये कार्यरत असताना 'मोटिव्हेशन' मिळणे हे महत्त्वाचे असते. यामुळे कामातील उत्साह कायम राहतो. शासकीय सेवेमध्येही पदोन्नती हे 'मोटिवेशन' आहे. या प्रणालीमुळे पदोन्नतीची प्रक्रिया गतिमान होऊन शासकीय सेवेमध्ये नियुक्ती आदेशापासून ते सेवा निवृत्तीच्या कागदपत्रापर्यंत संपूर्ण व्यवस्था डिजिटल स्वरूपात आली आहे. यंत्रणेमधील प्रत्येक अधिकाऱ्याला 'ग्राउंड रियालिटी'वर काम केलेले असल्यामुळे राज्यापुढील आव्हाने, प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्या अनुभवांचा, ज्ञानाचा चांगला उपयोग होतो. सामान्य प्रशासन विभागाने या प्रणालीच्या विकासात मोलाची भूमिका बजाविल्याबद्दल विभागाचे अभिनंदनही मुख्यमंत्र्यांनी केले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, आजचा दिवस राज्याच्या शासन पद्धतीत महत्वपूर्ण म्हणून नोंदला जाईल. महा ई-एचआरएमएस प्रणाली लागू करणे हे क्रांतिकारी पाऊल आहे. कुठल्याही शासकीय धोरणाची उपक्रमाची यशस्विता ही धोरणाच्या अंमलबजावणी करणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेवर अवलंबून असते. ही यंत्रणा सक्षम असल्यास धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होते. या प्रणालीमुळे राज्याने डिजिटल प्रशासनाच्या क्षेत्रात पुढाकार घेतला आहे. या प्रणालीमुळे सेवाविषयक बाबींमध्ये गतिमानता येईल. सहा डिजिटल साधने एकत्रित करून ही प्रणाली विकसित केली आहे, असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले. अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांनी प्रास्ताविकात या उपक्रमाचा प्रवास कथन केला. त्या म्हणाल्या, या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील आयएएस संवर्गाचा समावेश करण्यात आला असून, पुढील टप्प्यात राज्य शासनाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात येणार आहे. या प्रणालीत शासनाच्या ४२ विभागांमधील १२३ आस्थापनांमध्ये प्रचलित असलेल्या विविध नियम व कार्यपद्धतींचे एकत्रीकरण आहे. यावेळी मुंबईच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल, पुणेचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सौरभ काटीयार, सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन, सामान्य प्रशासन विभागाचे सह सचिव सुभाष उमराणीकर, उपसचिव अनुष्का दळवी, कक्ष अधिकारी प्रियांका तावडे, श्वेता सुर्यवंशी, विशाल ढोले, लेखा व कोषागारे संचालनालयाच्या संचालक दिपा देशपांडे, एन.आय.सी.च्या सपना कपूर यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामान्य विभागाच्या उपसचिव लीना संखे यांनी केले, तर आभार सहसचिव प्रशांत बडगेरी यांनी मानले.

'महा ईएचआरएमएस'मुळे १९३५ पासून प्रचलित असलेल्या भौतिक सेवापुस्तकाऐवजी संरचित डिजिटल ई सेवा पुस्तक उपलब्ध होणार आहे. ई ऑर्डर मॉड्यूलमधून निर्गमित होणाऱ्या प्रत्येक आदेशाच्या आधारे संबंधित सेवाविषयक नोंदी स्वयंचलितपणे अद्ययावत होतील. संबंधित अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना एसएमएस अथवा ई-मेलद्वारे सूचना मिळतील. त्यामुळे त्यांच्या संपूर्ण सेवाकालातील आदेशांनुसार डिजिटल सेवापुस्तक सातत्याने अद्ययावत राहील. 'जिज्ञासा' हा स्वदेशी आणि सार्वभौम स्वरूपाचा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित स्मार्ट सहाय्यक आहे. आयएएस तसेच एआयएस सेवांशी संबंधित नियमांच्या आधारे तो प्रशिक्षित करण्यात आला आहे. त्याद्वारे अधिकाऱ्यांना सेवाविषयक नोंदी, लागू सेवा नियम, अनुज्ञेय हक्क आणि अन्य सेवाविषयक बाबींची माहिती व मार्गदर्शन मिळू शकेल. 'मेंटॉर मेंटी' पोर्टलच्या माध्यमातून वरिष्ठ अधिकाऱ्यांचा क्षेत्रीय कामकाजाचा अनुभव, प्रशासकीय कौशल्ये आणि संस्थात्मक ज्ञान कनिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. ईएचआरएमएस मोबाईल पद्धारे अधिकारी आणि कर्मचारी कोणत्याही ठिकाणाहून वेतन पावती पाहणे, उपस्थितीची नोंद तपासणे तसेच रजेचा अर्ज सादर करणे अशा सेवांचा लाभ घेऊ शकतील.

राष्ट्रीय सूचना-विज्ञान केंद्राच्या महाराष्ट्र राज्य घटकाने हा सुरक्षित, ओपन सोर्सवर आधारित, एकात्मिक आणि भविष्यवेधी डिजिटल मानव संसाधन प्लॅटफॉर्म विकसित केला आहे. 'परिचय' आणि 'नॅपिक्स' तंत्रज्ञानाचा त्यात वापर करण्यात आला असून, ई-ऑफिस, आयगॉट कर्मयोगी, महापार, सेवार्थ, एनपीएस, डिजिलॉकर, भाषिणी, ई-कॅबिनेट तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावरील अन्य प्लॅटफॉर्मशी त्याची जोडणी करण्यात आली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ब्लॉकचेनसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाचाही या प्लॅटफॉर्ममध्ये समावेश आहे. 'जिज्ञासा', 'महा-एआय' आणि 'अनुभव एआय' यांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामासाठी बुद्धिमान सहाय्य उपलब्ध होईल.

(पान १ वरून) **मंत्री संजय राठोड...**

'महा वॉकेथॉन - वॉक फॉर वॉटर'ला मिळालेला प्रतिसाद या अभियानाला निश्चितच नवे बळ देणारा आहे. एका दिवसाच्या उपक्रमापुरता मर्यादित न राहता जलसंधारणाचा संदेश प्रत्येक गावापर्यंत आणि प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मंत्री संजय राठोड यांनी केले. 'माती वाचली तर शेती वाचेल, पाणी जपले तर भविष्यातील पिढ्यांचे जीवन सुरक्षित होईल. जलसंधारणाची जबाबदारी शासनासोबतच समाजाचीही आहे. 'वॉक फॉर वॉटर'मधून महाराष्ट्राने दिलेला संदेश आता प्रत्यक्ष कृतीत उतरवून जलसंधारणाची लोकचळवळ अधिक व्यापक करूया,' असे मंत्री राठोड यांनी सांगितले.






हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय - घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे - ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर - भ्रमणध्वनी - ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार - ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)